# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**प्रेसनोट ४९-२३** **दिनांक :- १०/०२/२०२३**

## ऑनलाईन एस्कॉर्ट सर्व्हिसेसच्या माध्यमातुन वेश्याव्यवसाय चालवणा-या आरोपीतास अटक करुन २ पिडित महिलांची सुटका - अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांची कारवाई.

दिनांक ०८.०२.२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, संजय उर्फ विजय यादव रा. अंबावाडी, दहिसर पूर्व हा इंटरनेटवरील वेबसाईटवरील दिसणा-या जाहिरातीव्दारे मोबाईल नंबरवर गिहाईकाने संपर्क साधला की, पुरुष गिहाईकाशी बोलणी करुन, व्हॉटसअॅप मोबाईल नंबरवर पुरुष गिहाईकांना मुलींचे काही फोटो पाठवुन वेश्यागमनाचा मोबदला ठरवून मिरा-भाईन्दर परिसरातील लॉजमध्ये रुम बुक करुन किंवा गि-हाईकाचे सोयीनुसार वेश्यागमनाकरीता मुली पुरवितो.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने कायदेशीर बाबींची पुर्तता करुन वेश्यादलाल १) संजय उर्फ विजय यादव याने इंटरनेटरवर दिलेल्या मोबाइलवर पंचासमक्ष संपर्क करुन वेशागमनाकरीता बोगस गि-हाईकाचे व्हॉटसअॅप मोबाइलवर काही मुलींचे फोटो पाठवून त्याचेतील एका मुलीची पंसती केल्यानंतर वेशागमनाचा मोबाइला ठरवून त्यातील काही रक्कम वेश्यादलाल संजय उर्फ विजय यादव यांने दिलेल्या मोबाईल नंबरवर फोन पे करण्यास सांगुन उर्वरित रक्कम पिडीत महिलेंसह वेश्यागमनासाठी पुरविण्यात येईल त्यावेळी त्यांचा साथीदार अॅटो रिक्षा चालक याचेकडे देण्यास सांगुन न्यु जी. सी. सी. क्लब बिल्डीगसमोर, हाडकेश, काशिमीरा या ठिकाणी बोगस गि-हाईकास बोलावून संजय उर्फ विजय यादव याने त्याचा साथीदार अॅटो रिक्षाचालक रविप्रसाद बाबुलाल यादव याचे रिक्षातुन वेशागमनाकरीता एका मुलीस पाठवून उर्वरित रक्कम पंचासमक्ष स्विकारली, त्या दरम्यान अॅटो रिक्षा चालक वेश्यादलाल रविप्रसाद बाबुलाल यादव यास १७.१० वा. ताब्यात घेवुन केलेल्या तपासात वेश्यादलाल १) संजय उर्फ विजय यादव याचा साथीदार २) अभिषेक रजक रा. अंबावाडी, दहिसर पूर्व व ३) अॅटो रिक्षा चालक रविप्रसाद यादव असे इंटरनेटवरुन पुरुष गि-हाईकांशी संपर्क करुन पिडीत महिलांना पैशाच्या मोबदल्यात वेश्यागमनासाठी प्रवृत्त करुन पाठविले जात असल्याचे निदर्शनास आल्याने अॅटो रिक्षा चालक वेश्यादलाल रविप्रसाद यादव, वय ४२ वर्ष यास छापा कारवाई दरम्यान रोख रक्कम व इतर मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले व ०२ पिडित महिलांची सुटका करण्यात आली. सदरबाबत स.फौ.उमेश हरी पाटील यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन वर नमुद अटक व पाहिजे आरोपीतांविरुध्द काशिमीरा पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. I १०६/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३७०, ३४ सह अ.व्या.प्रति.अधि. १९५६ चे कलम ४, ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री. समीर अहिरराव, स.फौ. उमेश पाटील, चा.पो.हवा. गावडे, म.पोअं. अश्विनी भिलारे सर्व नेम. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष,भाईंदर यांनी केली आहे.